VOL- IX ISSUE- VIII AUGUST 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# सहकार्यात्मक अध्ययन : युग्म विचार पध्दती

**वैभव मारुती बेंडाळे**
संशोधक

**डॉ. सरिता नागोराव गाडेगावकर**
संशोधक मार्गदर्शक

शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड

## प्रस्तावना

21 व्या शतकात प्रवेश करताना अनेक राष्ट्रांना राजकीय, सामजिक, आर्थिक, तांत्रिक आणि शैक्षणिक बदलांचा सामना करावा लागत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावाने जग हे छोटे बनले आहे. जगाच्या एखादया भागात काही क्रिया घडली तरी जगाच्या इतर भागात त्याचा प्रभाव पडतो. यामुळे जगभरातील व्यक्ती आणि समुदायांना एकत्र येऊन एकमेकांवर अवलंबुन राहणे गरजेचे बनले आहे. जगभरातील देशांना यश मिळवायचे असेल तर इतरांशी सहकार्य करणे आवश्यक आहे. जागतिक कार्यशैलीत टिकुन राहण्यासाठी सहकार्याने काम करण्याचे कौशल्य प्रत्येकाने आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे.

## विद्यार्थ्यामधील सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षकांची भूमिका

वर्गातील विद्यार्थ्यांना सहकार्यात्मक अध्ययनाचे अनुभव देण्यासाठी शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतात. यामध्ये शिक्षक वर्गातील विद्यार्थ्यांचे सहकार्यात्मक अध्ययनासाठी गट करणे, गटामध्ये नेमके कोणते कार्य करायचे, गटातील विद्यार्थ्यांचे वर्तन कसे असावे याबाबत मार्गदर्शन करतात. याबरोबरच छोटया गटातील विद्यार्थ्यांच्या चर्चादरम्यान त्यांच्यातील संवाद वाढविण्यात शिक्षकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संवाद साधण्यास आणि एकत्रितपणे कार्य करण्यास मदत केल्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ एकमेकांकडून शिकायला मिळते असे नाही तर त्यांना गटात दिलेली कार्य पूर्ण करण्यास व गटांत त्यांनी घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी स्वीकारण्यास देखील सक्षम करतात.

व्याख्यान पध्दतीत विद्यार्थी स्वत: उस्फुर्तपणे विचार करणारे प्रश्न विचारत नाही, आपले पूर्वज्ञान नवीन ज्ञानाशी जोडत नाही, एखादया घटनेचे वर्णन करु शकत नाही. परंतु जेव्हा विद्यार्थ्यांना एकत्रितपणे बोलण्यास आणि तर्क करण्यास शिकविले जाते. याचबरोबर गटातील चर्चेमुळे विद्यार्थ्यामध्ये समस्या निराकरण करण्यास सक्षम करतात.

सहकार्यात्मक अध्यापनाची संकल्पना ही प्राचीन काळापासून भारतात आस्तित्त्वात आहे. गुरुकुल पध्दतीपासून ही संकल्पना सुरु झालेली आहे. महाभारतात एक श्लोक आहे,

**आचार्यात पद्मादत्ते, पदम शिष्य सवमेधया,**
**पदमेकम स्वम्हचरिविः, पदम कालक्रमणे ही II**

याचाच अर्थ असा की, विद्यार्थ्याचे एक चतुर्थांश शिक्षण अध्यापकाकडून होते, एक चतुर्थांश स्व अध्ययनातून होते, एक चतुर्थांश सहकारी विद्यार्थ्याकडुन होते. यामुळेच आंतया संबंधातून आधिक चांगल्या पध्दतीने शिकतात. सहकार्यात्मक अध्ययन ही अध्यापनासंबंधीची अशी कार्यनीती आहे ज्यामध्ये विद्यार्थ्याचे छोटे-छोटे गट केले जातात. या गटांमध्ये विदयार्थ्यांच्या अध्ययनासाठी विविध प्रकारच्या कृती दिल्या जातात. विविध क्षमता असणा-या विद्यार्थ्यांचा

एक गट तयार केला जातो. गटामधील प्रत्येक विध्यार्थी सक्रीयपणे अध्ययन करण्यास आणि आपल्या गटातील इतर सहकार्याना मदत करण्यास बांधील असतो. विद्यार्थ्यांचे सहकार्यात्मक अध्ययन घडून यावे यासाठी वर्गात वेगवेगळया कृतीचे आयोजन केले जाते. त्यापैकी युग्म विचार पध्दतीची महिती आपण या लेखात घेणार आहोत.

## युग्म विचार पध्दती

गप्पा मारणे ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे. दोन व्यक्ती एकमेकांशेजारी बसल्या की त्यांच्यामध्ये आपोआप गप्पा सुरु होतात. अपरिचीत व्यक्तीमध्येही गप्पा सुरु होतात. या गप्पांमधून एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण होते. शैक्षणिक बाबीमध्ये या गप्पांचा आपण अध्ययन-अध्यापनात उपयोग करुन घेऊ शकतो. यालाच युग्म विचार पध्दती म्हणतात. इंग्रजीमध्ये याला थिंक-पेअर-शेअर असे म्हणतात. पूर्व संशोधनातून हे सिध्द झाले आहे की, विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापनाच्या वातावरणात एकमेकांशी बोलण्याची संधी दिली तर त्यांच्या बोलण्यातून त्यांच्या कल्पनांचा विस्तार करण्याची संधी मिळते आणि यातून त्यांचे अध्ययन समृध्द होण्यास मदत होते.

## युग्म विचार कार्यनीतीच्या पाय-या

युग्म विचार कार्यनीतीच्या पाय-या खालील मुदयांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

१. **विचार करणे:-** विचार करण्याच्या पायरीमध्ये विद्यार्थ्यांना आशयाशी संबंधित एखादी समस्या किंवा प्रश्न दिला जातो. या समस्येवर किंवा प्रश्नावर विचार करण्यासाठी आशयाच्या स्वरुपानुसार वेळ दिला जातो. विदयार्थी आपआपल्या क्षमतेनुसार त्या समस्या किंवा प्रश्नांवर विचार करतात.

२. **जोडया करणे:-** विदयार्थ्यांनी दिलेल्या वेळेत समस्या किंवा प्रश्नावर विचार केल्यानंतर विदयार्थ्यांच्या जोडया केल्या जातात. विदयार्थ्यांच्या या जोडया शिक्षक सहेतूक पध्दतीने करतात. या जोडया भिन्न क्षमतेचे किंवा भिन्न स्वभावाच्या विदयार्थ्यांच्या जोडया सहेतूक पणे केल्या जातात. याचबरोबर विदयार्थ्यांना आधिक स्वतंत्र देण्यासाठी विदयार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार जोडया करण्याची संधी दिली जाऊ शकते. विदयार्थ्यांच्या जोडया झाल्यानंतर त्यांना आपल्या सहका-यांशी,चर्चा करण्यासाठी पुन्हा काही वेळ दिला जातो. या निर्धारित वेळेत विदयार्थी आपल्या सहकाय-याशी समस्या किंवा प्रश्नावर जो विचार केला आहे त्याबाबत चर्चा करतो. विदयार्थी आपल्या सहकाय-यासोबत समस्या किंवा प्रश्नाच्या समाधानावर चर्चा करतात. या पायरीमध्ये उपलब्ध विदयार्थी संख्येनुसार चार ते पाच विदयार्थ्याचे गटही तयार करता येऊ शकतात.

३. **सामायिक करणे:-** गटात चर्चसाठी दिलेला वेळ संपल्यानंतर विदयार्थी आपल्या सहकार्यासोबत केलेल्या चर्चतून जे विचार समोर आले ते सर्वासमोर सादर करुन सामयिक करतात. वर्गात जेवढया जोडया असतील त्याचे गटप्रमुख गटातील चर्चा सर्वासमोर प्रकट करतात

## युग्म विचार पध्दतीत शिक्षकाची भूमिका

- युग्म विचार पधदतीचा वर्गात वापर करण्यापूर्वी शिक्षकांनी पाठातील समस्या, प्रश्न अगोदर तयार करुन ठेवतात.
- या पध्दतीत विदयार्थ्याला नेमके काय करायचे आहे, हे शिक्षकाने स्पष्ट करावे.
- विदयार्थ्यांना त्यांच्या वर्गातील सहका-यांची मदत घेऊन तंत्राचा वापर कसा करायचा हे स्पष्ट करावे.

- हे तंत्र वापरताना विद्यार्थ्यांना काही अडचण आल्यास प्रश्न विचारण्यास सांगावे.

**युग्म विचार पध्दतीचे आणखी प्रकार खालीलप्रमाणे आहेत.**

१. विचार करा-लिहा-जोडी करा- सांगा
२. वाचा - लिहा - जोडी करा — सांगा
३. लिहा - जोडी करा — सांगा
४. द्विविचार - युग्म पध्दती

**युग्म विचार पध्दतीचे फायदे**

- युग्म विचार कार्यनीती वापरण्यास सोपी आहे.
- विद्यार्थ्यांच्या सर्जजनशीलतेला वाव मिळेल असे प्रश्न विचरता येतात.
- वर्गातील प्रत्येक विद्यार्थी कार्यशील राहतो.
- विद्यार्थी स्वत: विचार करुन उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतो.
- वर्गात कमी बोलणारे, लाजणारे, शांत स्वभावाचे विद्यार्थीही सहभागी होतात.
- विद्यार्थ्यांनी आशयासंदर्भात स्वत: विचार केल्याने तो आशय विद्यार्थ्यांच्या कायमस्वरुपी लक्षात रहातो.

**युग्म विचार पध्दतीच्या मर्यादा**

- विद्यार्थ्यांच्या चर्चेला आणि सर्जनशीलतेला वाव मिळेल असे प्रश्न तयार करण्याचे आव्हान शिक्षकांसमोर असते.
- शिक्षकांना वेळेचे नियोजन करावे लागते.
- पूर्वनियोजन हा फार महत्त्वाचा घटक आहे. पूर्वनियोजनशिवाय युग्म विचार पध्दती यशस्वी होऊ शकत नाही.

अशाप्रकारे सहकार्यात्मक अध्ययनाच्या युग्म विचार पधदतीचा वापर करुन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पार पाडता येते. पारंपरिक पध्दतीपेक्षा वेगळी व विदयार्थ्यांना वर्गाध्यापनात सक्रिय करुन सहकार्याची, एकत्र काम करण्याची भावना निर्माण होण्यासाठी युग्म विचार पध्दतीचा वापर करुन शिक्षक आपले अध्यापन प्रभावी करु शकतात.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. आगाशे ललिता (2020), **सहयोगी शिक्षण.** पुणे : प्रज्ञार्थ प्रकाशन
2. चव्हाण गणेश (2012), **वर्तमान शिक्षणातील आस्थेचे नवविचार प्रवाह,** नाशिक : इनसाईट प्रकाशन.
3. जगताप ह.ना.(2010), **शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने,** पुणे : नित्यनुतन प्रकाशन.
4. कुमार सुशील आणि पाथरे नीला (2019), **अध्यापनाच्या कार्यनीती.** जळगाव :
5. प्रशांत पब्लिकेशन